BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

केंद्र शासनाच्या निवडक कल्याणकारी योजनांचा आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून अध्ययन : विशेष संदर्भ अमरावती जिल्हा (2016–2026)

पूजा आनंद मेश्राम

संशोधक विध्यार्थिनी,अर्थशास्त्र विभाग,

जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय,

खामगाव, जि. बुलढाणा, महाराष्ट्र

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

Email : poojameshram@0801gmail.com

डॉ. संजय तुकाराम वराडे

संशोधन मार्गदर्शक, प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग

जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय,

खामगाव, जि. बुलढाणा, महाराष्ट्र

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

Email : tsanjay21@gmail.com

गोषवारा :

भारतातील आर्थिक विकास प्रक्रियेत कल्याणकारी योजनांना महत्त्वाचे स्थान आहे. आर्थिक विषमता कमी करणे, गरिबीचे निर्मूलन करणे, रोजगाराच्या संधी निर्माण करणे, शेतकऱ्यांच्या उत्पन्नाला आधार देणे, आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन देणे आणि समाजातील वंचित घटकांचे जीवनमान सुधारणे या उद्दिष्टांनी केंद्र शासनामार्फत विविध कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी केली जाते. विशेषतः २०१४ नंतर आर्थिक समावेशन, कृषी क्षेत्र, कौशल्य विकास, स्वयंरोजगार, गृहनिर्माण, आरोग्य, स्वच्छता आणि सामाजिक सुरक्षा या क्षेत्रांमध्ये विविध योजनांना प्राधान्य देण्यात आले.

प्रस्तुत संशोधन लेखाचा उद्देश केंद्र शासनाच्या निवडक कल्याणकारी योजनांचा आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून आढावा घेणे हा आहे. या अभ्यासासाठी साहित्य समीक्षा पद्धतीचा वापर करण्यात आला असून, संबंधित संशोधन लेख, शासकीय अहवाल, धोरणविषयक दस्तऐवज आणि उपलब्ध दुय्यम माहितीच्या आधारे योजनांच्या उद्दिष्टांचे, लाभांचे आणि अंमलबजावणीशी संबंधित प्रश्नांचे विश्लेषण केले आहे. प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी,

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना, प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना, सुकन्या समृध्दी योजना आणि आयुष्मान भारत यांसारख्या योजनांच्या माध्यमातून आर्थिक व सामाजिक विकासाला चालना देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. प्रस्तुत विश्लेषणात या योजनांच्या व्यापक स्वरूपासोबतच विदर्भ व अमरावती जिल्ह्यासारख्या कृषी क्षेत्रातील स्थानिक वास्तवाचा विशेष संदर्भ विचारात घेण्यात आला आहे.

कल्याणकारी योजनांचे मूल्यमापन केवळ लाभार्थ्यांची संख्या किंवा वितरित आर्थिक मदत यांच्या आधारे न करता, लाभांचे प्रत्यक्ष वितरण, लाभार्थ्यांच्या आर्थिक स्थितीतील बदल, रोजगारनिर्मिती, सामाजिक सुरक्षितता आणि प्रादेशिक विषमता कमी करण्यातील योगदान या निकषांवर करणे आवश्यक आहे. योजनांच्या परिणामकारकतेसाठी प्रभावी अंमलबजावणी, पारदर्शकता, जनजागृती आणि लाभार्थ्यांपर्यंत योजनांचा सुलभ प्रवेश महत्त्वाचा ठरतो. प्रस्तुत साहित्य समीक्षा कल्याणकारी योजनांच्या आर्थिक व सामाजिक परिणामांचे आकलन करण्यास, प्रादेशिक स्तरावरील अमंलबजावानीतील त्रुटी समजून घेण्यास आणि भविष्यातील संशोधनासाठी संभाव्य दिशा निश्चित करण्यास उपयुक्त ठरू शकते.

बीजशब्द : कल्याणकारी योजना, आर्थिक -सामाजिक विकास, आर्थिक समावेशन, रोजगारनिर्मिती, साहित्य समीक्षा, विदर्भ.

प्रस्तावना :

कल्याणकारी राज्य ही आधुनिक शासनव्यवस्थेतील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. कल्याणकारी राज्यामध्ये शासनाची भूमिका केवळ कायदा व सुव्यवस्था राखणे आणि प्रशासकीय कार्ये पार पाडणे एवढ्यापुरती मर्यादित नसून, ती नागरिकांच्या आर्थिक व सामाजिक कल्याणासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे हीदेखील शासनाची जबाबदारी असते. शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवारा, सामाजिक सुरक्षा आणि आर्थिक संधींची उपलब्धता या बाबी कल्याणकारी राज्याच्या कार्यक्षेत्रात समाविष्ट होतात. भारतासारख्या विकसनशील देशात आर्थिक विकासाबरोबरच उत्पन्नातील विषमता, ग्रामीण दारिद्र्य, कृषी क्षेत्रातील अनिश्चितता, बेरोजगारी, असंघटित क्षेत्रातील कामगारांची असुरक्षितता आणि मूलभूत सुविधांमधील असमानता ही महत्त्वाची आव्हाने आहेत. देशाच्या एकूण आर्थिक प्रगतीचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचत नाही. त्यामुळे आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत वंचित आणि दुर्बल घटकांचा सहभाग वाढविण्यासाठी शासनाच्या कल्याणकारी हस्तक्षेपाला विशेष महत्त्व प्राप्त होते.

भारतात स्वातंत्र्यानंतर विविध पंचवार्षिक योजना, रोजगारविषयक उपक्रम, ग्रामीण विकास कार्यक्रम आणि सामाजिक सुरक्षा योजना राबविण्यात आल्या. कालांतराने आर्थिक उदारीकरण, तंत्रज्ञानाचा विकास, लोकसंख्येतील बदल आणि आर्थिक गरजांनुसार कल्याणकारी धोरणांच्या स्वरूपातही बदल झाले. केंद्र शासनाने २०१४ नंतर आर्थिक समावेशन, थेट लाभ हस्तांतरण, कृषी सहाय्य, उद्योजकता, कौशल्य विकास, गृहनिर्माण, स्वच्छता आणि आरोग्य संरक्षण यांसारख्या क्षेत्रांवर विशेष भर दिला आहे. प्रधानमंत्री जनधन योजना आर्थिक सेवांपासून वंचित असलेल्या नागरिकांना बँकिंग व्यवस्थेशी जोडण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आली. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे पात्र शेतकरी कुटुंबांना आर्थिक सहाय्य दिले जाते. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना कौशल्य प्रशिक्षणाद्वारे रोजगारक्षमतेत सुधारणा करण्याचा प्रयत्न करते, तर प्रधानमंत्री मुद्रा योजना सूक्ष्म व लघु व्यवसायांना कर्जपुरवठ्याच्या माध्यमातून प्रोत्साहन देते. त्याचप्रमाणे प्रधानमंत्री पीक विमा योजना कृषी क्षेत्रातील जोखमींचे व्यवस्थापन करण्यासाठी, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना ग्रामीण आणि वंचित कुटुंबातील महिलांना मोफत एलपीजी गॅस कनेक्शन उपलब्ध करून देण्यासाठी, प्रधानमंत्री आवास योजना निवासाची उपलब्धता वाढविण्यासाठी आणि आयुष्मान भारत आरोग्य संरक्षणासाठी महत्त्वाची ठरते.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

या योजनांचे महत्त्व केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नाहीत, बँकिंग सेवांचा विस्तार, औपचारिक आर्थिक व्यवहारांमध्ये सहभाग, स्वयंरोजगाराच्या संधी, आरोग्यावरील खर्चाचा आर्थिक भार कमी करण्याची शक्यता आणि मूलभूत सुविधांपर्यंत पोहोच यांसारख्या बाबींचाही त्यांच्याशी संबंध आहे. त्यामुळे कल्याणकारी योजनांचा अभ्यास करताना आर्थिक आणि सामाजिक अशा दोन्ही दृष्टिकोनांचा समन्वय आवश्यक आहे. तरीही, एखादी योजना सुरू करणे आणि तिच्या माध्यमातून अपेक्षित विकास साध्य होणे या दोन भिन्न बाबी आहेत. योजनेची उद्दिष्टे, पात्रतेचे निकष, निधीची उपलब्धता, अंमलबजावणीची यंत्रणा, लाभार्थ्यांची जागरूकता आणि स्थानिक परिस्थिती यांवर तिचे परिणाम अवलंबून असतात. काही योजनांमध्ये लाभार्थ्यांची नोंदणी वाढली असली, तरी त्या लाभांचा उत्पन्न, रोजगार किंवा जीवनमानावर झालेला परिणाम स्वतंत्रपणे तपासणे आवश्यक असते. याच पार्श्वभूमीवर, विदर्भ विशेषतः अमरावती जिल्ह्यासारख्या कृषीप्रधान भागातील उपलब्ध संशोधन साहित्याच्या आधारे या योजनांच्या प्रत्यक्ष परिणामांचा आढावा घेणे प्रस्तुत अभ्यासात महत्त्वाचे ठरते.

संशोधनाची उद्दिष्टे

१. केंद्र शासनाच्या निवडक कल्याणकारी योजनांची उद्दिष्टे आणि स्वरूप यांचा आढावा घेणे.

२. केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजनांवरील निवडक संशोधन पेपर्सचा अभ्यास करणे.

३. संबंधित संशोधनांमधील पद्धती, निष्कर्ष आणि मर्यादांची चिकित्सक समीक्षा करणे.

४. उपलब्ध साहित्यामधील संशोधनाच्या उणिवा ओळखून पुढील संशोधनासाठी दिशा निश्चित करणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत लेख हा दुय्यम माहितीवर आधारित साहित्य समीक्षा लेख आहे. या लेखामध्ये वर्णनात्मक दृष्टिकोन वापरला आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील पीअर-रिव्ह्यूड जर्नल्स, केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांचे वार्षिक अहवाल आणि नीति आयोगाचे निर्देशांक यांचा संदर्भ घेण्यात आला आहे. यासाठी निवडक संशोधन पेपर्समधील उद्दिष्टे, संशोधन पद्धती, निष्कर्ष आणि मर्यादांचा अभ्यास केला आहे. योजनांची माहिती व लाभार्थीविषयक आकडेवारीसाठी संबंधित मंत्रालये, अधिकृत योजना संकेतस्थळे आणि भारत सरकारच्या प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरोने (PIB) प्रकाशित केलेल्या माहितीस प्राधान्य दिले आहे.

केंद्र शासनाच्या कल्याणकारी योजनांचे वर्गीकरण

योजनांचे त्यांच्या प्रमुख उद्दिष्टांनुसार वर्गीकरण केल्यास त्यांचे आर्थिक व सामाजिक महत्त्व समजून घेण्यास सोपे होते.

१. आर्थिक समावेशन व आर्थिक सहाय्य :- प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना आणि प्रधानमंत्री स्वनिधी योजना या बँकिंग सेवा, कर्जप्राप्ती व आर्थिक व्यवहारांना प्रोत्साहन देतात.

२. कृषी व शेतकरी कल्याण :- प्रधानमंत्री किसान सन्मान निधी आणि प्रधानमंत्री पीक विमा योजना या शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य व पीक नुकसानीपासून संरक्षण देण्याशी संबंधित आहेत.

३. कौशल्य विकास व रोजगारक्षमता :- प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना युवकांच्या कौशल्यवृद्धी, प्रशिक्षण आणि रोजगारक्षमता वाढविण्यावर भर देते.

४. निवास व स्वच्छता :- प्रधानमंत्री आवास योजना आणि स्वच्छ भारत मिशन या निवास, स्वच्छता व मूलभूत जीवनमानाशी संबंधित आहेत.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

५. आरोग्य व स्वच्छ इंधन :- आयुष्मान भारत आणि प्रधानमंत्री उज्ज्वला योजना आरोग्यसेवा व स्वच्छ इंधनाच्या उपलब्धतेशी संबंधित आहेत.

६. मुलींचे भविष्य व सामाजिक विकास :- सुकन्या समृद्धी योजना आणि बेटी बचाओ, बेटी पढाओ अभियान मुलींचे भविष्य सुरक्षित करणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि मुलींबाबत सामाजिक दृष्टिकोन बदलणे यांवर भर देतात.

केंद्र शासनाच्या १२ निवडक कल्याणकारी योजनांची सविस्तर माहिती :-

१. प्रधानमंत्री जनधन योजना (PMJDY)

ही योजना वित्त मंत्रालयाच्या वित्तीय सेवा विभागांतर्गत २८ ऑगस्ट २०१४ रोजी देशभरात सुरू करण्यात आली. देशातील प्रत्येक कुटुंबाला औपचारिक बँकिंग प्रणालीशी जोडणे, शून्य शिल्लक (Zero Balance) बँक खाते उघडणे, मोफत RuPay डेबिट कार्ड देणे आणि अंगभूत अपघाती विमा संरक्षण देणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, या योजनेअंतर्गत आतापर्यंत देशभरात ५३ कोटींपेक्षा जास्त बँक खाती उघडण्यात आली आहेत. आर्थिक दृष्टिकोनातून, या योजनेने ग्रामीण बचतीला औपचारिक रूप दिले असून थेट लाभ हस्तांतरणाचा (DBT) पाया रचला आहे. सामाजिक दृष्टिकोनातून, ५० टक्क्यांहून अधिक महिलांची खाती उघडल्यामुळे त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळाले आहे आणि त्यामुळे त्यांच्या निर्णय घेण्याच्या क्षमतेत वाढ झालेली आहे.

२. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (PM-KISAN)

कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत २४ फेब्रुवारी २०१९ रोजी ही योजना सुरू झाली. देशातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकरी कुटुंबांना प्रतिवर्ष ₹६,००० चे थेट उत्पन्न साहाय्य तीन समान हप्त्यांमध्ये देणे हे याचे उद्दिष्ट आहे. सध्या देशातील सुमारे ११ कोटींपेक्षा जास्त शेतकरी कुटुंबे या योजनेचा लाभ घेत असून, यामध्ये ३ कोटींहून अधिक महिला शेतकऱ्यांचा समावेश आहे. आर्थिक बाजू पाहता, पेरणीपूर्वी खते, बी-बियाणे खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना वेळेवर खेळते भांडवल मिळते, ज्यामुळे सावकारी कर्जावरील अवलंबित्व घटले आहे. सामाजिकदृष्ट्या, यामुळे शेतकरी कुटुंबांचे जीवनमान स्थिरावण्यास मदत झालेली आहे.

३. प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY)

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयाच्या (MSDE) अंतर्गत १५ जुलै २०१५ रोजी 'कौशल्य भारत मिशन'च्या (Skill India) अंतर्गत ही योजना सुरू करण्यात आली. देशातील युवकांना बाजारपेठेच्या मागणीनुसार उद्योग-आधारित कौशल्य प्रशिक्षण देणे, पूर्व शिक्षणाला मान्यता (RPL) देणे आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हे याचे मुख्य ध्येय आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत देशभरात १.४० कोटींपेक्षा अधिक तरुणांना विविध क्षेत्रांत प्रमाणित प्रशिक्षण देण्यात आले आहे. आर्थिक दृष्टीने, यामुळे मानवी भांडवलाची गुणवत्ता वाढून उत्पादक रोजगाराची निर्मिती होते. सामाजिक पातळीवर, शाळा-कॉलेज अर्धवट सोडलेल्या आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील तरुणांना स्वाभिमानी उपजीविकेचे साधन प्राप्त होते.

४. प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी (PM SVANidhi)

गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने (MoHUA) १ जून २०२० रोजी ही विशेष सूक्ष्म-कर्ज योजना सुरू केली. कोविड-१९ महामारीच्या काळात आर्थिक फटका बसलेल्या शहरी भागातील फेरीवाले आणि पथविक्रेत्यांना व्यवसाय पुन्हा सुरू करण्यासाठी ₹१०,००० ते ₹५०,००० पर्यंत विनातारण खेळते भांडवल उपलब्ध करून देणे हा याचा हेतू होता. या योजनेचा लाभ देशातील ६५ लाखांहून अधिक पथविक्रेत्यांनी घेतला आहे. आर्थिक दृष्टिकोनातून, डिजिटल व्यवहारांवर कॅशबॅक आणि

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

वेळेवर परतफेडीवर व्याज सवलत मिळाल्याने छोट्या विक्रेत्यांची पतपुरवठा क्षमता वाढली. सामाजिकदृष्ट्या, या वर्गाला सावकारांच्या बंधनातून मुक्त करून व्यावसायिक सन्मान व स्थैर्य प्राप्त झाले.

५. प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY)

वित्त मंत्रालयामार्फत ८ एप्रिल २०१५ रोजी प्रधानमंत्री मुद्रा योजना सुरू करण्यात आली. बिगर-कॉर्पोरेट आणि बिगर-कृषी सूक्ष्म व लघू उद्योगांना बँकांमार्फत तीन टप्प्यांत—शिशू (₹५०,००० पर्यंत), किशोर (₹५०,००० ते ५ लाख) आणि तरुण (₹५ लाख ते १० लाख)—कर्जपुरवठा करणे हे याचे उद्दिष्ट आहे. शासकीय आकडेवारीनुसार, आतापर्यंत देशभरात ४८ कोटींपेक्षा जास्त मुद्रा कर्जे मंजूर झाली आहेत. आर्थिकदृष्ट्या, यामुळे तळागाळात स्वयंरोजगार वाढला आणि अनौपचारिक सूक्ष्म क्षेत्राचे औपचारिकीकरण झाले. सामाजिक पातळीवर, एकूण लाभार्थ्यांपैकी तब्बल ६९% महिला उद्योजक आहेत आणि अनुसूचित जाती, जमाती व इतर मागासवर्गातील घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यात योजनेने मोठे योगदान दिले आहे.

६. प्रधानमंत्री पीक विमा योजना (PMFBY)

कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने १३ जानेवारी २०१६ रोजी ही योजना जाहीर केली आणि खरीप २०१६ हंगामापासून ती लागू झाली. पूर, दुष्काळ, कीड व रोगांमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना अत्यंत कमी हप्त्यात (खरीप २%, रब्बी १.५%, बागायती ५%) व्यापक विमा संरक्षण देणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे. दरवर्षी सुमारे ४ कोटींहून अधिक शेतकरी या योजनेत सहभाग नोंदवतात, ज्यामध्ये कर्ज न घेतलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाण ५५% पर्यंत वाढले आहे. आर्थिकदृष्ट्या, यामुळे शेतीतील उत्पन्नविषयक जोखीम कमी होऊन शेतकऱ्यांना आर्थिक सुरक्षा लाभते. सामाजिकदृष्ट्या, ही योजना शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी आणि ग्रामीण समाजात मानसिक सुरक्षितता निर्माण करण्यासाठी महत्त्वाची ठरते.

७. सुकन्या समृद्धी योजना (SSY)

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' अभियानाचा भाग म्हणून वित्त मंत्रालय आणि महिला व बालविकास मंत्रालयाने २२ जानेवारी २०१५ रोजी पानिपत येथून ही योजना सुरू केली. मुलींच्या उच्च शिक्षणासाठी आणि विवाहासाठी आर्थिक तरतूद करणे, तसेच पालकांना दीर्घकालीन बचतीची सवय लावणे हा याचा मुख्य हेतू आहे. देशात सध्या ३.३ कोटींपेक्षा जास्त सुकन्या समृद्धी खाती सक्रिय आहेत. आर्थिकदृष्ट्या, या खात्यावर आकर्षक व्याजदर आणि प्राप्तिकरात पूर्ण सवलत मिळत असल्याने मध्यम व गरीब कुटुंबांची बचत सुरक्षित राहते. सामाजिक दृष्टिकोनातून, मुलीकडे कौटुंबिक भार म्हणून न बघता एक आर्थिक संपत्ती म्हणून बघण्याचा सकारात्मक दृष्टिकोन समाजात रुजण्यास मदत झाली आहे.

८. प्रधानमंत्री आवास योजना (PMAY - ग्रामीण व शहरी)

गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय (शहरी भागासाठी - २५ जून २०१५) आणि ग्रामीण विकास मंत्रालय (ग्रामीण भागासाठी - २० नोव्हेंबर २०१६) यांच्यामार्फत सर्वांसाठी घरे देण्याच्या उद्देशाने ही योजना सुरू करण्यात आली. कच्च्या घरात राहणाऱ्या आणि बेघर कुटुंबांना पक्के घर बांधण्यासाठी आर्थिक अनुदान (ग्रामीण भागात ₹१.२० लाख ते ₹१.३० लाख) थेट बँक खात्यात दिले जाते. आतापर्यंत ग्रामीण भागात २.६ कोटींहून अधिक आणि शहरी भागात ८५ लाखांपेक्षा जास्त घरांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. आर्थिक पातळीवर, यामुळे स्थानिक बांधकाम क्षेत्रात मजुरी व रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आणि गरिबांची स्थावर मालमत्ता तयार झाली. सामाजिक पातळीवर, घरांची मालकी प्रामुख्याने घरातील महिलांच्या नावे (सुमारे ७५% घरे) दिल्याने महिलांचे सक्षमीकरण आणि सामाजिक प्रतिष्ठा वाढलेली आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

९. स्वच्छ भारत अभियान (SBM)

पेयजल व स्वच्छता मंत्रालय (ग्रामीण) आणि गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालय (शहरी) यांच्यामार्फत २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधींच्या जयंतीदिनी हे राष्ट्रव्यापी अभियान सुरू झाले. उघड्यावरील शौचास पूर्णपणे आळा घालून देश हागणदारीमुक्त करणे, कचरा व्यवस्थापन सुधारणे आणि लोकांच्या सवयींमध्ये स्वच्छताविषयक वर्तणूक बदल घडवून आणणे ही याची मुख्य उद्दिष्टे होती. या अभियानांतर्गत देशभरात ११ कोटींहून अधिक वैयक्तिक शौचालये बांधण्यात आली असून बहुतांश गावे हागणदारीमुक्त (ODF) घोषित झाली आहेत. आर्थिकदृष्ट्या, अस्वच्छतेमुळे होणाऱ्या आजारांवरील वैद्यकीय खर्चात मोठी घट झालेली दिसून येते. सामाजिकदृष्ट्या, ग्रामीण महिलांना उघड्यावर जावे न लागल्यामुळे त्यांचे आरोग्य, सुरक्षा, गोपनीयता आणि सन्मान टिकून राहिला.

१०. प्रधानमंत्री उज्ज्वला योजना (PMUY)

पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयामार्फत १ मे २०१६ रोजी बलिया (उत्तर प्रदेश) येथून ही योजना कार्यान्वित करण्यात आली. दारिद्र्यरेषेखालील आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबातील महिलांना मोफत एलपीजी (LPG) गॅस जोडणी देणे हे याचे प्रमुख उद्दिष्ट होते. आजपर्यंत देशभरात १०.३ कोटींपेक्षा जास्त उज्ज्वला गॅस वितरण करण्यात आलेले आहे; आर्थिक दृष्टिकोनातून, महिलांचा इंधन गोळा करण्यात वाया जाणारा वेळ वाचला, ज्याचा वापर त्या इतर आर्थिकदृष्ट्या उत्पादक कामांसाठी करू शकतात. सामाजिक व आरोग्यविषयक दृष्टीने, चुलीच्या लाकडी धुरामुळे महिला व बालकांना होणारे श्वसनाचे आजार आणि फुफ्फुसाचे आजार कमी झाले, तसेच पर्यावरणातील वृक्षतोड रोखण्यास सहाय्य लाभले.

११. बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना (BBBP)

महिला व बालविकास मंत्रालय, आरोग्य मंत्रालय आणि शिक्षण मंत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने २२ जानेवारी २०१५ रोजी पानिपत येथे या अभियानाची सुरुवात झाली. देशातील बाल लिंगगुणोत्तरातील (Child Sex Ratio) घट रोखणे, गर्भलिंग चाचणी प्रतिबंधक कायद्याची (PC&PNDT Act) काटेकोर अंमलबजावणी करणे आणि मुलींच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे याचे प्रमुख ध्येय आहेत. देशातील सर्व जिल्ह्यांमध्ये हे अभियान राबवले जात आहे; आर्थिक बाजू पाहता, मुलींचे उच्च शिक्षण वाढल्याने भविष्यात महिलांचा देशाच्या औपचारिक श्रमशक्तीतील सहभाग वाढण्यास मदत होईल. सामाजिक पातळीवर, मुलींप्रती असलेला पूर्वग्रहदूषित पारंपरिक दृष्टिकोन बदलण्यात आणि शाळांमधील मुलींच्या पटनोंदणीत वाढ घडवून आणण्यात या अभियानाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

१२. आयुष्मान भारत - प्रधानमंत्री जन आरोग्य योजना (PM-JAY)

आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय आरोग्य प्राधिकरणाने (NHA) २३ सप्टेंबर २०१८ रोजी रांची येथून ही जगातील सर्वात मोठी आरोग्य विमा योजना सुरू केली. देशातील अत्यंत दुर्बल आणि गरीब कुटुंबांना दुय्यम व तृतीयक वैद्यकीय उपचारांसाठी प्रति कुटुंब, प्रति वर्ष ₹५ लाखांचे कॅशलेस आरोग्य विमा संरक्षण देणे हे याचे मुख्य उद्दिष्ट आहे. देशभरात आतापर्यंत ३० कोटींहून अधिक आयुष्मान कार्डे वितरित करण्यात आली असून कोट्यवधी गरीब रुग्णांवर मोफत उपचार झाले आहेत. आर्थिकदृष्ट्या, आजारपणामुळे गरिबांचा होणारा अचानक मोठा वैद्यकीय खर्च वाचला गेला, ज्यामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी होऊन दारिद्र्यात ढकलली जाण्यापासून वाचली आहेत. सामाजिकदृष्ट्या, खासगी व सरकारी रुग्णालयांमध्ये गरीबांना सन्मानपूर्वक आधुनिक आरोग्य सेवा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

संबंधित साहित्याची सविस्तर समीक्षा

१. बेरळीकर प्रमोद (२०१९)

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

'रिसर्च जर्नी' या शोधपत्रिकेत प्रसिद्ध शोधनिबंधात स्वातंत्र्योत्तर काळात कल्याणकारी राज्याची बदलेली भूमिका आणि ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा कसा विकास झाला, याचा चिकित्सक आढावा घेतला आहे. आर्थिक पाहणी अहवाल व शासकीय सांख्यिकीसारख्या द्वितीयक सामग्रीच्या आधारे जलयुक्त शिवार अभियान, प्रधानमंत्री आवास योजना, स्वच्छ भारत अभियान, उज्ज्वला आणि दीनदयाळ उपाध्याय ग्राम ज्योती योजना या योजनांचे विश्लेषण करण्यात आले. त्यांच्या अभ्यासानुसार, जलयुक्त शिवार योजनेमुळे ३३ जिल्ह्यांतील ३,९९३ गावांमध्ये भूजल पातळी वाढून शेतीला मोठा फायदा झाला. याशिवाय, आवास व उज्ज्वला योजनेमुळे ग्रामीण भागातील कुटुंबांचे जीवनमान उंचावले. मात्र, हा अभ्यास पूर्णपणे केवळ शासकीय अहवाल व आकडेवारीवर आधारलेला असून प्रत्यक्ष जमीन पातळीवर योजनांची अंमलबजावणी कितपत पारदर्शक झाली आणि त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नात प्रत्यक्ष किती वाढ झाली, याचे प्राथमिक क्षेत्रीय मूल्यांकन यात मांडलेले नाही, ही या संशोधनात उणीव जाणवते.

२. पिसोळकर प्रशांत (२०२०)

पिसोळकर प्रशांत यांनी 'बी. आधार' या आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेत केंद्र सरकारच्या वित्तीय समावेशन व सामाजिक सुरक्षा योजनांचा क्षेत्रीय अभ्यास मांडला आहे. यासाठी त्यांनी वाशीम जिल्ह्यातील मंगरूळपीर तालुक्यातील 'इचा' या गावातील १०० लोकांची निवड करून मुलाखती व प्रश्नावलीद्वारे माहिती गोळा केली. त्यांच्या पाहणीत असे दिसून आले की, प्रधानमंत्री जनधन योजनेविषयी सर्वाधिक म्हणजे ६०% लोकांमध्ये माहिती होती. त्याखालोखाल सुरक्षा विमा (४०%) आणि जीवन ज्योती विम्याविषयी (३०%) लोकांना माहिती असल्याचे आढळले; मात्र अटल पेन्शन (२०%) व श्रमयोगी मानधन योजनेबाबत (केवळ १०%) लोकांनाच माहिती होती या योजनांबाबत लोकांमध्ये फारशी जनजागृती दिसली नाही. या योजनांचा लाभ घेणाऱ्यांमध्ये पुरुष, पदवीधर आणि मध्यम उत्पन्न गटातील व्यक्तींचे प्रमाण अधिक आहे. बँक खाती उघडली गेली असली, तरी आर्थिक साक्षरतेअभावी विमा व पेन्शन योजना तळागाळातील गरजूंपर्यंत हव्या त्या प्रमाणात पोहोचू शकल्या नाहीत. हा अभ्यास केवळ एकाच गावातील १०० लोकांपुरता मर्यादित असल्याने या निष्कर्षांच्या आधारे संपूर्ण विदर्भातील स्थितीचा सर्वसमावेशक अंदाज बांधता येत नाही.

३. रे असिम आणि अली अलीम (२०२१)

२०१४ नंतर ग्रामीण भागातील गरिबी, बेरोजगारी आणि स्थलांतराचा प्रश्न सोडवण्यासाठी केंद्र शासनाने राबवलेल्या विविध योजनांचे मूल्यांकन रे असिम आणि अली अलीम यांनी 'इन्स्पिरा - जेएमएमई' या शोधपत्रिकेत मांडले आहे. संबंधित मंत्रालयांचे वार्षिक अहवाल व आकडेवारीचा अभ्यास करून त्यांनी हे निष्कर्ष नोंदविले आहे. त्यानुसार, प्रादेशिक ग्रामीण बँकांमध्ये (RRB) उघडलेल्या जनधन खात्यांमध्ये ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचे प्रमाण तब्बल ८७.१४% इतके मोठे होते, तसेच मुद्रा योजनेअंतर्गत ६९% आणि 'स्टँड अप इंडिया' मध्ये ८३% महिला लाभार्थी आहेत. कौशल्य विकासाच्या DDU-GKY योजनेतही ३७.८२% महिला आणि ४५% हून अधिक अनुसूचित जाती-जमातीचे तरुण सहभागी झालेले दिसते. या योजनांनी ग्रामीण भागात बिगर-शेती स्वयंरोजगाराला बळ दिले असले, तरीही हा संपूर्ण अभ्यास देशपातळीवरील शासकीय आकडेवारीवरच आधारित आहे. त्यामुळे स्थानिक पातळीवरील प्रशासकीय दिरंगाई, नोकरशाहीच्या अडचणी किंवा प्रत्यक्ष अंमलबजावणीतील त्रुटी या शोधनिबंधात स्पष्ट होत नाहीत.

४. गुलिया कायन (२०२५)

कायन गुलिया यांनी 'लेक्स लोकालीस - जर्नल ऑफ लोकल सेल्फ-गव्हर्नमेंट' मधील संशोधन निबंधात केंद्र सरकारच्या १३ प्रमुख योजनांचे मूल्यमापन केले आहे. त्यांनी राष्ट्रीय बहुआयामी दारिद्र्य निर्देशांकाच्या (MPI) चौकटीत आणि नऊ वेगवेगळ्या धोरणात्मक निकषांवर या योजनांची तुलना केलेली. त्यांच्या निष्कर्षानुसार, PM-KISAN किंवा NFSA

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

सारख्या थेट रोख रक्कम व धान्य देणाऱ्या योजनांपेक्षा NRLM, PMKVY आणि पीएम दक्ष सारख्या मानवी कौशल्य वाढवणाऱ्या योजना गरिबी निर्मूलनात जास्त प्रभावी ठरतात. थेट अनुदानाने लोकांचे शासनावरील अवलंबित्व वाढते, तर कौशल्य विकासामुळे कायमस्वरूपी रोजगाराची संधी निर्माण होते; त्यामुळे कोणत्याही एका योजनेवर न थांबता एकात्मिक धोरण राबवणे गरजेचे असल्याचे त्यांनी प्रतिपादित केले. मात्र, हे संशोधन उपलब्ध साहित्याच्या गुणात्मक विश्लेषणावर आधारलेले असल्याने, त्याला प्रत्यक्ष सांख्यिकी पडताळणीच्या दृष्टीने काही उणीवा जाणवतात.

५. आंबाडकर आणि इतर (२०२३)

आंबाडकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी 'पीएम-किसान सन्मान निधी' योजनेविषयी शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनाचा अभ्यास केला आहे. 'इंटरनॅशनल जर्नल ऑफ ॲग्रिकल्चरल सायन्सेस' मध्ये प्रसिद्ध झालेल्या या शोधपत्रिकेत अमरावती व भातकुली तालुक्यातील १० गावांमधून १२० शेतकऱ्यांच्या मुलाखती घेऊन ही माहिती गोळा करण्यात आली. अभ्यासानुसार, सुमारे ६७.५०% शेतकऱ्यांचा या योजनेकडे मध्यम स्वरूपाचा सकारात्मक कल दिसून आला. शेतजमीन, कृषी विस्तार अधिकाऱ्यांशी संपर्क आणि सामाजिक सहभाग या घटकांमुळे शेतकऱ्यांचा योजनेविषयी चांगला दृष्टिकोन तयार झाल्याचे आढळले. आर्थिक अडचणीच्या वेळी हा निधी थोडाफार हातभार लावत असला, तरी शेती उत्पादन वाढवण्यासाठी किंवा नवीन तंत्रज्ञान घेण्यासाठी ही रक्कम पुरेशी पडत नाही, असे मत शेतकऱ्यांनी व्यक्त केले. हा अभ्यास फक्त अमरावतीच्या दोन तालुक्यांमधील मर्यादित शेतकऱ्यांवर आधारित असल्याने, याचे निष्कर्ष संपूर्ण भागासाठी सरसकट लागू करता येत नाहीत.

६. जोस आणि इतर (२०२४)

विदर्भातील केंद्र पुरस्कृत कृषी योजनांची (PKVY, PMKSY आणि SHC) प्रत्यक्ष अंमलबजावणी तपासताना येणाऱ्या अडचणींवर जोस आणि इतर संशोधकांनी प्रकाश टाकला आहे. 'जर्नल ऑफ सायंटिफिक रिसर्च अँड रिपोर्ट्स' मधील या अभ्यासासाठी अमरावती व बुलढाणा जिल्ह्यातील ३६० शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून गॅरेट रँकिंग पद्धतीने हे विश्लेषण करण्यात आले. यातून असे स्पष्ट झाले की, सेंद्रिय शेती योजनेमध्ये (PKVY) उत्पादित मालाला योग्य बाजारपेठ न मिळणे, सिंचन योजनेत (PMKSY) अनुदानाचा पैसा वेळेवर न येणे व भारनियमन असणे, आणि सॉईल हेल्थ कार्ड योजनेत (SHC) तपासणी अहवाल उशिरा मिळणे या मुख्य समस्या शेतकऱ्यांना भेडसावत असल्याचे समोर आले. यावर उपाय म्हणून अनुदानाचे थेट व वेळेवर वाटप व्हावे, शेतकरी उत्पादक कंपन्यांमार्फत (FPO) बाजारपेठ मिळावी आणि माती परीक्षण प्रयोगशाळा वाढवाव्यात अशा महत्त्वाच्या सुधारणा शेतकऱ्यांनी सुचवल्या. हा अभ्यास केवळ दोन जिल्ह्यांतील शेतकऱ्यांच्या वैयक्तिक मतांवर आधारलेला असल्याने, या निष्कर्षांना स्थानिक आणि भौगोलिक मर्यादा जाणवतात.

साहित्यातील निष्कर्षांचे एकत्रित विश्लेषण

वरील सर्व संशोधन अभ्यासांचा एकत्रित विचार करता, केंद्र व राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी व विकास योजनांचे परिणाम प्रामुख्याने दोन महत्त्वाच्या बाजू दर्शवतात:

१. सकारात्मक प्रभाव

थेट लाभ आणि मध्यस्थांचा अंत :- जनधन, आधार आणि मोबाईल (JAM) या त्रिसूत्रीमुळे तसेच थेट लाभ हस्तांतरणामुळे (DBT) निधी थेट लाभार्थ्यांच्या खात्यात जमा होऊ लागला असून पूर्वी असणारी मध्यस्थांची साखळी मोठ्या प्रमाणावर मोडीत निघाली आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

महिला सक्षमीकरण व आर्थिक सहभाग :- प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरांची मालकी, उज्ज्वला योजनेतील गॅस जोडणी आणि मुद्रा व स्टँड अप इंडिया योजनांमधून मिळणारे व्यवसाय कर्ज यांमुळे महिलांचा औपचारिक वित्तीय व्यवहारांत आणि घरातील निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला आहे.

ग्रामीण पायाभूत सुविधा व स्वयंरोजगार :- जलयुक्त शिवारसारख्या उपक्रमांमुळे जलसंधारण व शेती उत्पादकतेला हातभार लागला, तर कौशल्य विकास (DDU-GKY) आणि सूक्ष्म कर्जांमुळे ग्रामीण भागात बिगर-शेती स्वयंरोजगाराचे नवे मार्ग निर्माण झाले.

२. अंमलबजावणीतील त्रुटी व आव्हाने

माहिती आणि साक्षरतेचा अभाव :- योजनांची उद्दिष्टे कितीही चांगली असली, तरी ग्रामीण व दुर्गम भागात आर्थिक व डिजिटल साक्षरता कमी असल्याने योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत वेळेवर पोहोचत नाही. त्यामुळे पदवीधर किंवा तुलनेने जागरूक वर्ग लाभ आधी मिळवतो आणि अत्यंत गरजू वर्ग दुर्लक्षित राहतो.

प्रशासकीय दिरंगाई व पायाभूत मर्यादा :- ग्रामीण भागात बँकिंग सुविधांचे अपुरे जाळे, कागदपत्रांची पूर्तता करताना होणारा प्रशासकीय विलंब आणि स्थानिक स्तरावरील त्रुटी यांमुळे लाभार्थ्यांना वेळेवर आर्थिक लाभ मिळत नाही, ज्यामुळे योजनांच्या प्रत्यक्ष परिणामकारकतेवर मर्यादा येतात.

शाश्वत विकासाचा अभाव :- केवळ रोख रक्कम किंवा तात्पुरते अनुदान वाटप केल्याने नागरिकांचे शासनावरील अवलंबित्व वाढते. त्याऐवजी मानवी कौशल्य संवर्धन, उपजीविकेची साधने आणि कायमस्वरूपी उत्पन्नाचे स्रोत निर्माण करणाऱ्या एकात्मिक धोरणांची कमतरता जाणवते.

संशोधन-अंतर

साहित्य समीक्षेच्या आधारे खालील महत्त्वपूर्ण संशोधन-अंतर स्पष्टपणे दिसून येतात :

देशपातळीवरील उपलब्ध अभ्यासांमध्ये प्रामुख्याने समग्र भारताची आकडेवारीचे विश्लेषण आढळते, तर स्थानिक पातळीवरील काही अभ्यास केवळ एखाद्या गावापुरते मर्यादित राहिले आहेत. मात्र, विशिष्ट सामाजिक-आर्थिक आव्हाने आणि विकासात्मक असमतोलाची पार्श्वभूमी असलेल्या अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण व निमशहरी भागातील विविध समाजघटकांवर कल्याणकारी योजनांचा एकत्रित आर्थिक व सामाजिक प्रभाव नेमका कसा पडला, यावर समग्र संशोधनाचा अभाव आढळतो.

विविध कल्याणकारी योजनांमुळे गरजू कुटुंबांना तात्पुरता आर्थिक आधार मिळत असला, तरी या आर्थिक मदतीतून दीर्घकालीन कौटुंबिक व व्यावसायिक मालमत्ता प्रत्यक्ष निर्माण झाली का, यावर अर्थशास्त्रीय विश्लेषणाचा अभाव जाणवतो. तसेच, वित्तीय समावेशनासारख्या उपक्रमांतून मोठ्या प्रमाणावर बँक खाती उघडली गेली असली, तरी ही खाती केवळ शासनाकडून मिळणारे अनुदान काढण्यापुरतीच वापरली जात आहेत की त्यांच्या माध्यमातून ग्रामीण जनता नियमित बचत, विमा आणि पतव्यवहारांसाठी त्यांचा कितपत वापर केला, याबाबत लोकांच्या आर्थिक वर्तनाचा नेमका अभ्यास आधीच्या संशोधनात झालेला दिसत नाही.

तसेच, पश्चिम विदर्भ व अमरावती जिल्ह्यामध्ये झालेली बहुतांश पूर्व-संशोधन हे केवळ पीक विमा, पीएम-किसान किंवा मुद्रा योजनेसारख्या मोजक्या घटकांपुरती स्वतंत्रपणे झाली आहे. मात्र, हे सर्व अभ्यास विशिष्ट एकाच योजनेपुरते किंवा ठरावीक भौगोलिक नमुन्यापुरते मर्यादित राहिले असून, त्यामध्ये योजनांचे स्वतंत्र आणि एकांगी मूल्यमापन करण्यावरच भर

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

दिलेला आढळतो. कृषी, स्वयंरोजगार, वित्तीय समावेशन, कौशल्य विकास, गृहनिर्माण आणि सामाजिक सुरक्षितता या वेगवेगळ्या क्षेत्रांतील योजनांचा ग्रामीण व निमशहरी कुटुंबांच्या आर्थिक सक्षमतेवर होणारा 'एकत्रित व आंतर-क्षेत्रीय प्रभाव' तपासणारे संशोधन अद्याप झालेले नाही. क्षेत्रांतील कल्याणकारी योजनांचा एकाच कुटुंबाला किंवा घटकाला मिळणाऱ्या विविध शासकीय लाभांमुळे त्यांच्या निव्वळ उत्पन्नात झालेली वाढ, मालमत्ता निर्मिती, कर्जबाजारीपणातील घट आणि एकूण राहणीमानात झालेला शाश्वत बदल यांचा एकत्रित व तुलनात्मक आढावा घेणाऱ्या अभ्यासाचा स्पष्ट अभाव जाणवतो. हाच बहुआयामी अभ्यास प्रस्तुत संशोधनाची मुख्य उणीव ठरतो.

सूचना व शिफारसी

उपलब्ध साहित्याच्या विश्लेषणावरून पुढील उपाययोजना सुचवता येतील :

१. शासकीय योजनांची माहिती आणि अर्ज प्रक्रिया सुलभ करण्यासाठी ग्रामपंचायत पातळीवर थेट 'एक खिडकी सेवा केंद्र' सुरु करावे.

२. लाभार्थ्यांना केवळ रोख अनुदान देण्याऐवजी त्यांना कौशल्य प्रशिक्षण आणि सूक्ष्म व्यवसायाची जोड देऊन स्वावलंबी बनवावे, ज्यामुळे शासनावरील अवलंबित्व कमी होईल.

३. फक्त बँक खाती उघडण्यापूरते मर्यादित न राहता बँक मित्रांमार्फत गावागावांत विमा, पेन्शन आणि डिजिटल सुरक्षिततेविषयी नियमित जनजागृती सत्रे घ्यावीत.

४. विदर्भसारख्या दुष्काळग्रस्त भागासाठी पीक विमा आणि सिंचन योजनांचे नियम स्थानिक हवामान तसेच पावसाच्या अनियमिततेचा विचार करून अधिक लवचिक ठेवावे.

संदर्भसूची

1) बेरळीकर, पी. बी. (२०१९). अगदी अलीकडील सरकारच्या कल्याणकारी योजना. Research Journey International Multidisciplinary E-Research Journal, Special Issue 106, 142–144.

2) पिसोळकर, पी. एम. (२०२०). सरकारच्या कल्याणकारी योजनांचे विश्लेषणात्मक अध्ययन (विशेष संदर्भात मंगरूळपीर तालुक्यातील इचा या गावाचे अध्ययन). B.Aadhar International Multidisciplinary Research Journal, Special Issue, 216–223.

3) Gulia, K. (2025). Impact of poverty alleviation schemes in India: A review. Lex Localis - Journal of Local Self-Government, 23(11), 653–673.

4) Ray, A., & Ali, A. (2021). An analytical study of Central Government schemes from 2014 onwards in the context of rural development. Inspira-Journal of Modern Management & Entrepreneurship (JMME), 11(2), 60–67.

5) आंबाडकर, ए. पी., देशमुख, ए. एन., मोखाले, एस. यु., देशमुख, एस. ए., आणि मौजे, डी. डी. (२०२३ Attitude of farmers towards PM-Kisan Samman Nidhi. International Journal of Agricultural Sciences, 19(2), 476–478.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

6) जोस, ए. ई., टेकाळे, व्ही. एस., कोष्टी, एन. आर., वाकळे, पी. के., वाळके, आर. डी., शेंडे, एन. व्ही., आणि खडसे, व्ही. ए. (२०२४). Assessment of constraints and suggestion insights from beneficiaries of centrally sponsored agricultural schemes: A study of PKVY, PMKSY and SHC in Vidarbha region of Maharashtra, India. Journal of Scientific Research and Reports, 30(10), 631–642.

7) भारत सरकार, वित्तीय सेवा विभाग. प्रधानमंत्री जनधन योजना. https://pmjdy.gov.in/

8) भारत सरकार, कृषी व शेतकरी कल्याण विभाग. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना. https://pmkisan.gov.in/

9) भारत सरकार. प्रधानमंत्री पीक विमा योजना. https://pmfby.gov.in/

10) भारत सरकार. बेटी बचाओ, बेटी पढाओ. https://www.pmindia.gov.in/en/government_tr_rec/beti-bachao-beti-padhao-caring-for-the-girl-child/

11) भारत सरकार. प्रेस इन्फॉर्मेशन ब्युरो. https://pib.gov.in/

12) कोळंबे, रं. (२०२४). भारतीय अर्थव्यवस्था (१५ वी आवृ.). भगीरथ प्रकाशन.

13) देसले, कि. जी. (२०२३). स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र: भाग - २ (आर्थिक व सामाजिक विकास) (८ वी आवृ.). दीपस्तंभ प्रकाशन.